


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २७९, बुधवार २४ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# आंदोलन थांबविण्यासाठी पाच कोटींची ऑफर!

■ खा. नीलेश लंके यांचा गौप्यस्फोट ■ दरमहा पाकीट देण्याचेही आमिष ■ खा. लंके यांच्या आंदोलनाचा दुसरा दिवस

नगर : विशेष प्रतिनिधी

**मी हे आंदोलन करू नये यासाठी शेकडो लोकांचे मध्यस्थीसाठी मला फोन आले. पाच कोटी रूपये देतो, महिन्यालाही पाकीट ठरवून देतो अशी ऑफर देण्यात आली होती. असा गौप्यस्फोट खा. नीलेश लंके यांनी केला. जर हे लोक पाच कोटी रूपये देत असतील तर हे पैसे कुठून आले ? वाईट मार्गाने पैसे कमावून मनमानी पध्दतीने कारभार सुरू असल्याचे लंके म्हणाले.**

पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेमधील भ्रष्टाचाराविरोधात खा. लंके यांनी सुरू केलेल्या उपोषणाच्या दुसऱ्या दिवशीही जिल्हाभरातील नागरिकांनी लंके यांच्याकडे शेकडो तक्रारी केल्या. आंदोलनातील मागण्यांसंदर्भात पोलीस अधिक्षकांशी दोनदा शिष्टमंडळाने चर्चाही केली, मात्र ती निष्फळ ठरली.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, आपण हाती घेतला विषय शेवटला नेला तरच या खात्यात सुरू असलेल्या भ्रष्टाचाराला आळा बसणार आहे. समाजाचे रक्षकच भक्षक झाले आहेत. सर्वसामान्यांना त्रास देण्याचे काम केले जात आहे. एका कर्मचाऱ्याची दहा ते बारा वर्षे एकाच ठिकाणी ठेवले जाते. गुन्हे शाखेतील निलंबित कर्मचारी ५०० दिवस गैरहजर असताना त्यास पुन्हा हजर करून घेतले जाते. ज्या विभागातून निलंबित झाला त्याच विभागात सबंधित पोलीस निरीक्षक त्या कर्मचाऱ्याला त्या विभागात बोलवून घेतो. आर्थिक संबंधातून अशा अनेक गोष्टी केल्या जातात. त्याचे कागदोपत्री पुरावे आपल्याकडे आहेत असे त्यांनी सांगितले.



■ मंगळवारी सकाळी खा. नीलेश लंके यांनी आंदोलनस्थळी स्वत. सफाई केली.



■ मंगळवारी दुपारी जिल्हा रूग्णालयाच्या वैद्यकिय पथकाने खा. लंके यांची वैद्यकिय तपासणी केली.

## कागदोपत्री पुरावे

जिल्ह्यात मोठया प्रमाणावर अवैध धंदे वाढले असून त्यातून हत्या घडण्याचे प्रमाण वाढले आहे. चंदन तस्करी, लोखंड, स्टील, रेशनींग, गुटखा, कॅफे, वाळू, आयपीएल सटटा, गुटखा, पेट्रोल डिझेलची तस्करी, जुगार क्लब, वेश्या व्यवसाय, बिंगो हे अवैध व्यवसाय कसे हाताळले जातात याचीही आपल्याकडे सविस्तर माहीती आहे. बिंगो, आयपीएल सट्टा यामुळे अनेक तरूणांनी आपले जीवन संपविले आहे. सुवर्णकार व्यवसायीकांना मोठया प्रमाणावर त्रास दिला जातो.

नीलेश लंके खासदार

## कर्डीले ठरवितो कोणला कोणते पोलीस ठाणे !

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी अतिशय चुकीच्या पध्दतीने कामकाज केले आहे. याच शाखेचा कर्डीले नावाचा कर्मचारी कोणत्या पोलीस ठाण्यात कोणता कर्मचारी बसवायचा हे ठरवितो. पोलीस अवैध व्यवसायांना पार्टनर आहेत याचेही पुरावे आपल्याकडे असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

## ठोस निर्णयाशिवाय माघार नाही

चुकीच्या पध्दतीने काम करणारे अधिकारी, कर्मचारी निलंबित झाले पाहिजेत. तसेच जिल्हयातील सर्व अवैध व्यवसाय बंद झाले पाहिजेत ही आमची मागणी आहे. आंदोलनास किती दिवस लागतील हे माहीती नाही. ठोस निर्णय झाल्याशिवाय मी माघार घेत नाही.

## पाच टक्के लोकांमुळे पोलीस यंत्रणा बदमान

पाच टक्के लोकांमुळे इतर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदनामी होत आहे. सामान्य पोलीस कर्मचारी रस्तावर राहतो, काम करतो त्यांना पगाराव्यतीरिक्त इतर कोणताही लाभ मिळाला नाही. चार सहा लोकांनी संपूर्ण पोलीस यंत्रणा बदनाम केली असल्याचे लंके म्हणाले.

## उपोषण सुरू झाले आणि प्रशासन सुतासारखे सरळ

खा. नीलेश लंके यांचे उपोषण सुरू झाले आणि पोलीस प्रशासन सुतासारखे सरळ झाले. लाचखोरीसाठी प्रलंबित ठेवण्यात आलेली प्रकारणे हातावेगळी करण्यात येत आहेत. एका नागरीकाच्या पेट्रोल पंपासाठीचे नाहरकत प्रमाण पत्र असेच खोळंबून ठेवण्यात आले होते. उपोषण सुरू झाल्यानंतर मात्र सबंधित कर्मचाऱ्याने हे प्रमाणपत्र घरपोच केले.

## धमकी देउन २०० ग्रॅम सोने घेतले !

**नगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस आमच्या घरी येऊन आम्हाला गाडीमध्ये टाकून घेऊन आले. अर्ध्या रस्त्यात आल्यावर गाडी थांबवून आम्हाला शेतामध्ये नेण्यात आले. पन्नास तोळे सोने द्या नाहीतर तुमच्या मुलांना तुरूंगात डांबू अशी धमकी देण्यात आली. गोरे, गोसावी, चव्हाण, जाधव या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे कृत्य केले. दोघा महिलांना ढकलून देण्यात आले. पोलीसांच्या जाचामुळे एका मुलाच्या डोक्यावर परिणाम झाला. पोलीसांनी बळजबरीने २०० ग्रॅम सोने घेतले. महिलांच्या गळयातील दागिनेही काढून घेण्यात आले. आजूनही त्यांचा त्रास सुरू आहे. आमचे अन्न पाणी बंद झाले असून त्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी औरंगाबाद जिल्हयातील पिडीत महिलेने केली.**

## नाकारलेल्या लोकांचा दरबार

पोलीस प्रशासनातील भ्रष्टाचाराविरोधात खा. नीलेश लंके यांनी सुरू केलेले उपोषण हे नाकारलेल्या लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी भरविलेला हा दरबार आहे. समाजावर वचक ठेवणाऱ्या पोलीस प्रशासनाविरोधात आंदोलन करणे सोपे काम नाही. या आंदोलनाच्या निमित्ताने सर्वसामान्य माणसाला न्याय मिळेल. पोलीस दलात बोकाळलेल्या भ्रष्टाचारास आळा बसेल. शेवगांव तालुक्यात साडेतिन ते चार हजार कोटीचा शेअर मार्केट घोटाळा झाला असून पोलीसांनी त्याकडे दुर्लक्ष केले. अगदी नागरीकांच्या तक्रारीही घेतल्या गेल्या नाहीत. शेअर मार्केटसबंधी तक्रारी स्विकारल्या जाणार नाहीत असा फलकच पोलीस ठाण्यात लावण्यात आला होता. हा घोटाळा करणारे पसार झाल्यानंतर पोलीसांना जाग आली. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही त्याकडे दुर्लक्ष केले. खा. लंके यांनी या प्रश्नात लक्ष घालून दोषींवर कारवाई होण्यासाठी पुढाकार घ्यावा.

शिवाजीराव काकडे, शेवगांव

## लंके यांची प्रकृती स्थिर

जिल्हा रूग्णालयाच्या डॉक्टरांनी पोलीस विभागाकडून पत्र प्राप्त झाल्यानंतर खा. नीलेश लंके, त्यांच्यासोबत उपोषणास बसलेले मा. नगरसेवक योगीराज गाडे, अशोक रोहोकले यांच्या प्रकृतीची तपासणी केली. लंके यांच्या रक्तातील साखर काहीशी वाढली असली तरी त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. योगीराज गाडे यांचीही प्रकृती स्थिर असून अशोक रोहोकले यांच्या रक्तातील साखर मात्र वाढलेली आढळून आल्याचे वैद्यकिय पथकाने सांगितले.

## पोलीसांचे रेटकार्ड

प्रशासनातील असा कोणताही विभाग नाही की जिथे सहज, विनामुल्य काम होते. पोलीस प्रशासनामध्ये तर प्रत्येक कामाचे रेटकार्ड ठरलेले आहे. पोलिस तसेच महसूल प्रशासनामध्ये सर्रास लुट सुरू आहे. अवैध व्यवसाय राजरोसपणे सुरू असल्याचा आरोप घनश्याम शेलार यांनी केला.

## ड्रॉप करणारांशी पोलीसांचे संगनमत

श्रीगोंदे तालुक्यात स्वस्तात सोने घेण्यासाठी लोक येतात. या तालुक्यात सोन्याची खान नाही तरी सोने स्वस्त कसे तर त्यामागचे कारण ड्रॉप हे आहे. ड्रॉप करण्याचे काम कोण करते हे पोलीसांना माहीती असते. स्वस्तात सोन्याचा व्यवहार झालेला असेल त्यावेळी देणाराकडे सोने नसतेच. मात्र या ड्रॉपमध्ये पैसे कीती मिळाले हे मात्र पोलीसांना ड्रॉप झाल्याबरोबरच समजलेले असते. याचाच अर्थ ड्रॉप करणारे आणि पोलीस यांचे संगणमत असून त्याचाही पर्दाफाश झाला पाहिजे.

घनश्याम शेलार
कॉंग्रेस नेते

## गुन्हेगारांना पाठबळ, सामान्यांची लुट

सर्वसामान्यांना पोलीस ठाण्यात जाण्याची भिती वाटते तर दुसरीकडे गुन्हेगारांना मात्र भिती वाटत नाही ही पोलीस दलाची स्थिती आहे. पोलीस ठाण्यांमध्ये राजरोसपणे पैसे घेऊन गुन्हे दडपले जातात. विनाकारण गुन्हयात गोवून लुट करण्याचे अनेक प्रयोग नेहमीच होतात. गुन्हेगारांना पाठबळ तर सर्वसामान्यांची लुट असे पोलीस दलाचे चित्र आहे. खा. लंके यांच्या या आंदोलनानंतर पोलीस खात्यातील ही लुट थांबेल अशी आशा आहे. भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्या करून त्यांची चौकशी करावी. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी घनश्याम शेलार यांनी केली.

## कुकडीच्या पाण्यासाठी आंदोलन करावे लागेल

कुकडी प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा नगर जिल्हयास होतो. मात्र कुकडी डाव्या कालव्याचे पाणी आपल्या जिल्हयाला मिळणारच नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. सहकार मंत्री दिलीप वळसे यांनी या प्रकल्पातील ३ टीएमसी पाणी पुणे जिल्हयाकडे वळविण्याची मागणी केली आहे. डिंबे-माणिकडोह टनेल रद्द करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. त्याविरोधातही आंदोलन करावे लागेल.

घनश्याम शेलार
कॉंग्रेस नेते

## खा. लंके यांनी केली स्वच्छता

सोमवारी आंदोलन सुरू झाल्यानंतर रात्रभर खा. लंके यांना भेटण्यासाठी नागरीक येत होते. मंगळवारी पहाटे चार वाजता ते झोपले आणि सहा वाजता उठले. उठल्यानंतर त्यांनी आंदोलनस्थळी पाण्याच्या बाटल्या तसेच इतर कचरा स्वतः साफ करण्यास सुरूवात केली. लंके हेच काम करू लागल्यानंतर इतरांनीही त्यांचे अनुकरण केले.

# अर्थसंकल्पानंतर शिंदे सरकारचे ६ धडाकेबाज निर्णय!

## मेंढपाळ बांधवांच्या खात्यावरही पैसे जमा होणार

मुंबई : प्रतिनिधी

**शिंदे-फडणवीस-पवार सरकारच्या राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सरकारच्या वतीने सहा महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. शिंदे-फडणवीस-पवार सरकारच्या राज्य मंत्रिमंडळाची मंत्रालयात आज बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. आशा स्वयंसेविकांसाठी मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचा निर्णय घेतला आहे.**




ऑनड्यूटी असताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास १० लाखांची तर कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास पाच लाखांची मदत देणार आहे. ५ एप्रिल २०२४ पासून योजना लागू केली आहे.

राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवणार

राज्यातील मेंढपाळांसाठी

उर्वरीत पान ३ वर









# चंदेरी

## उर्फी जावेद करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण!

राजकुमार राव, नुशरत भरुचा यांचा 'लव्ह सेक्स और धोका' हा चित्रपट चांगलाच



गाजला. नव्या पिढीच्या प्रेमाची एक विचित्र व्याख्या अन् त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या यावर बेतलेला हा चित्रपट प्रेक्षकांना प्रचंड आवडला. आता याच्या सीक्वेलची म्हणजेच 'लव्ह सेक्स और धोखा २' ची चर्चा सोशल मीडियावर पाहायला मिळत आहे. या सीक्वलमध्ये इंटरनेटच्या विश्वात प्रेम आणि नातेसंबंध यावर भाष्य करण्यात येणार असल्याचं सांगितलं जात आहे. या चित्रपटाबाबत एक नवीन अपडेट समोर आली आहे ती म्हणजे या चित्रपटातून इंटरनेट सेन्सेशन उर्फी जावेद मोठ्या पडद्यावर पदार्पण करताना दिसणार आहे.

आपल्या चित्रविचित्र फॅशनमुळे कायम लाईमलाइटमध्ये असणारी उर्फी या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार असल्याची चर्चा आहे. उर्फी तिच्या पेहरावामुळे कायम चर्चेत असते. तिच्यावर प्रचंड टीकादेखील होते, परंतु ती अतिशय बेधडकपणे या सगळ्याचा सामना करून तिला जे हवं आहे तेच ती करते. 'बिग बॉस ओटीटी'मुळे अधिक लोकप्रिय झालेल्या उर्फीने याआधीही अभिनयात नशीब आजमावलं आहे. टेलिव्हिजनवरील बऱ्याच मालिकांमध्ये उर्फी एका आदर्श सुनेच्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर आली आहे. 'लव्ह सेक्स और धोका २' या चित्रपटाचे कथानक हे उर्फीच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळते जुळते असल्याचं स्पष्ट होत आहे. एकता कपूरची प्रोडक्शन कंपनी बालाजी टेलीफिल्म्स याची निर्मिती करणार आहे. याआधी या चित्रपटात तुषार कपूर आणि मौनी रॉय हे दोघे झळकणार होते, पण या दोघांनी यासाठी नकार दिल्याचं सांगितलं जात आहे. इतकंच नव्हे तर हा चित्रपट १९ एप्रिल २०२४ रोजी प्रदर्शित होणार असल्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. उर्फी जावेद याआधी 'ए मेरे हमसफर', 'चंद्र नंदिनी', 'मेरी दुर्गा', 'साथ फेरो की हेरा फेरी', 'बेपना', 'डायन'सारख्या अनेक टेलिव्हिजन मालिकांमध्ये दिसली आहे. याबरोबरच तिने 'रिश्ता क्या कहलाता है', 'बडे भैया'सारख्या मालिकांमध्येही काम केलं आहे. आजकाल उर्फी केवळ पापाराझींसमोरच्या तिच्या चित्र-विचित्र आणि ग्लॅमरस फॅशनसाठी ओळखली जाते.

## कधीकाळी तीन अफेअर अन् आज एकटीच राहतेय अभिनेत्री नगमा!

कौटुंबिक पार्श्वभूमी अभिनय क्षेत्रातली नसूनही बॉलीवूडमध्ये अनेक अभिनेत्रींनी आपल्या कामाच्या जोरावर स्थान निर्माण केलं. आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आणि सुपरहिट चित्रपट दिले. अशीच एक अभिनेत्री आहे, जिने करिअरमध्ये सुपरहिट सिनेमे दिले, आघाडीच्या कलाकारांबरोबर काम केलं, केवळ हिंदीच नव्हे तर दाक्षिणात्य व भोजपुरी इंडस्ट्रीतही अभिनयाची जादू दाखवली. वैयक्तिक आयुष्यामुळेही प्रकाशझोतात राहिली. या अभिनेत्रीचं नाव नगमा आहे.

नगमा बॉलिवूडमधील सुंदर अभिनेत्रींपैकी एक आहे, तिने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. नगमाने हिंदी चित्रपटांमध्ये सलमान खान आणि शाहरुख खान सारख्या स्टार्ससह काम केलं. मग तिने दाक्षिणात्य सिनेसृष्टीत रजनीकांत यांच्यासह अनेक कलाकारांबरोबर चित्रपट केले. त्यानंतर ती भोजपुरी चित्रपटांकडे वळली. तिने तिच्या करिअरमध्ये एकूण ८१ चित्रपट केले. चित्रपटांसोबत वैयक्तिक आयुष्यामुळेही ती खूप चर्चेत राहिली. एकेकाळी नगमा तिच्या अफेअरच्या बातम्यांमुळे खूप चर्चेत होती. तिचं नाव भारतीय क्रिकेट संघाचा तत्कालीन कर्णधार सौरव गांगुलीबरोबर जोडलं गेलं होतं. या बातम्या आल्या तेव्हा सौरव विवाहित होते, पण नगमा किंवा सौरवने याबाबत कधीच प्रतिक्रिया दिली नाही.

यानंतर नगमा भोजपुरी चित्रपटांकडे वळली. इथं तिने मनोज तिवारी आणि रविकिशन यांच्याबरोबर काम केलं. त्यांची जोडी हिट ठरली आणि नगमाचं नाव या दोन्ही स्टार्सशी जोडलं जाऊ लागलं. खरंतर हे दोन्ही स्टार्स विवाहित होते. मनोज तिवारींनी या प्रकरणी मौन बाळगलं, पण रविकिशन यांनी याबद्दल प्रतिक्रिया दिली होती. आपल्याला नगमा खूप आवडते पण मी विवाहित आहे, असं रवीकिशन म्हणाले होते. याशिवाय नगमाचं नाव सरथ कुमार नावाच्या व्यक्तीशीही जोडलं गेलं होतं, पण हे नातंही टिकू शकलं नाही. काही काळानंतर नगमाने चित्रपटसृष्टी सोडली आणि ती राजकारणात गेली. आता ती काँग्रेस पक्षाची सदस्य असून अनेक वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहे. ४९ वर्षीय नगमा अजूनही अविवाहित आहे, तिने लग्न केलेलं नाही.



## लव्हस्टोरी अरबाज अन् शुराची...

**अरबाज खान आणि शुरा खान यांनी मित्रपरिवाराच्या उपस्थितीत लग्नगाठ बांधली. अरबाजच्या चाहत्यांना याचा सुखद धक्का बसला, कारण तोपर्यंत या कपलने त्यांच्या नात्याचा कुठेही खुलासा केला नव्हता. अरबाजने सांगितलं की, लग्नाआधी शुरा आणि तो एक वर्षापासून एकमेकांना डेट करत होते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अरबाजने त्याची आणि शुराची पहिली भेट कशी झाली, याबद्दल खुलासा केला आहे...**



अरबाज म्हणाला की, त्याने निर्मित केलेल्या 'पटना शुक्ला' चित्रपटाच्या सेटवर तो पहिल्यांदा शुराला भेटला. या चित्रपटात रवीना टंडन प्रमुख भूमिकेत होती आणि शुरा रवीनाची मेकअप आर्टिस्ट होती. अरबाजने सांगितलं की, शुरा रवीनाबरोबर सात ते आठ वर्षांपासून काम करत होती. 'पटना शुक्ला'च्याआधी अरबाज कधीच शुराला भेटला नव्हता किंवा तिच्याबद्दल कधी ऐकलं नव्हतं. अरबाज म्हणाला की, त्यांची लव्ह स्टोरी सेटवर भेटल्यानंतरसुद्धा खूप वेळानंतर सुरू झाली. सेटवरचा त्यांचा संवाद खूप मर्यादित होता. रवीनाची केसं नीट कर किंवा हॅलो, हाय वगैरे असे संवाद दोघांमध्ये व्हायचे. शूट संपल्यानंतर दोघं काही मीटिंग्समध्ये आणि पार्टीजमध्ये भेटले होते. त्यानंतर त्यांची ओळख वाढली. लोकांना कळण्याआधीच ते एक वर्ष एकमेकांना डेट करत होते. आम्ही स्वतःला खूप नशीबवान समजतो, कारण आम्ही एकमेकांना कॉफी शॉप्समध्ये भेटत होतो. मी तिला घरी सोडायलापण जायचो, तरीही आम्हाला मीडिया, पापाराझी किंवा कोणीही स्पॉट केलं नाही. दरम्यान, अरबाजच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचं झालं, तर १९ वर्षांच्या संसारानंतर २०१७ रोजी अरबाज खान आणि अभिनेत्री मलायका अरोरा यांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर अरबाज अभिनेत्री जॉर्जिया एंड्रियानीला डेट करत होता. अरबाजने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, शुराला भेटण्याआधी दोन वर्षांपूर्वी जॉर्जिया एंड्रियानी आणि त्याचं ब्रेकअप झालं होतं.

## गरोदरपणामुळे दिला होता नेहाला डच्चू..!

**नेहा धुपिया बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आतापर्यंत तिने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. सध्या नेहा चित्रपटात झळकत नसली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ पोस्ट करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. चित्रपटानंतर आता नुकतेच नेहाने ओटीटीवरही पदार्पण केले आहे. नुकताच तिचा ओटीटीवर 'नो फिल्टर नेहा'चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. या कार्यक्रमातून ती बॉलीवूडमधील अनेक कलाकारांच्या मुलाखती घेते.**




चित्रपटातून ब्रेक घेतल्यावर वाढलेले वजन अन् गरोदर राहिल्याने झालेले बदल यामुळे नेहाला चित्रपटसृष्टीत पुन्हा कमबॅक करताना आलेले अनुभव तिने नुकतेच एका मुलाखतीदरम्यान शेअर केले आहेत. 'झुम'शी संवाद साधताना नेहा म्हणाली, की मी जेव्हा या चित्रपटसृष्टीत आले तेव्हा महिला कलाकारांना एका ठराविक साच्यातल्याच भूमिका मिळायच्या. जर तुम्ही त्या साच्यात फिट बसत नसाल तर तुम्ही यासाठी योग्य नाही असं सरसकट ठरवलं जायचं. आता चित्र फार वेगळं आहे, कास्टिंगदेखील अगदी चपखल होतं, पण मला बऱ्याचदा कामावरून काढून टाकण्यात आलं आहे. माझा चेहरा आणि वजन कमी करण्यासाठी मी दिलेला नकार यामुळे मलाही बऱ्याचदा नकार पचवावा लागला आहे, असे ती म्हणाली. नेहा म्हणाली, की मी जेव्हा गरोदर होते तेव्हा एका कार्यक्रमातून मला काढून टाकण्यात आलं होतं अन् त्यानंतर तब्बल ८ महिने त्यांनी तो कार्यक्रम माझ्याशिवाय शूट केला. ते म्हणाले, की त्यांना माझ्याबरोबर काम करायचंच नाहीये. त्यामुळेच त्यांनी हा निर्णय घेतला. असे बरेच प्रकार माझ्याबाबतीत घडले आहेत, पण आता मात्र या गोष्टींचा माझ्यावर फार परिणाम होत नाही, असेही तिने सांगितले. नेहाच्या कामाबद्दल बोलायचे तर, ती शेवटची २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'ए थर्सडे'मध्ये दिसली होती. या चित्रपटात नेहाबरोबर यामी गौतमची मुख्य भूमिका होती. यामध्ये नेहाने पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. तसेच नेहाचा 'रोडीज' शोसुद्धा खूप गाजला होता. आता लवकरच नेहा अभिनेता गुलशन देवैयासह 'थेरपी शेरपी' या नव्या वेबसीरिजमध्ये झळकणार आहे.

## रकुलला आवडत नाही जॅकीची 'ही' सवय

बॉलीवूड अभिनेता जॅकी भगनानी व अभिनेत्री रकुल प्रीत सिंग २१ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकले. गोव्यात त्यांच्या शाही लग्नसोहळ्याची तयारी करण्यात आली होती. कुटुंबीय व जवळच्या मित्र-मैत्रिणींच्या उपस्थितीत हा लग्नसोहळा पार पडला. जॅकी व रकुलच्या लग्नाला बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती.

लग्नानंतर पहिल्यांदाच रकुलने डीएनए वुमन अचिव्हर्स अवॉर्ड्स कार्यक्रमात हजेरी लावली होती. या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीमध्ये तिने जॅकीबाबत अनेक खुलासे केले आहेत. तसेच जॅकी आणि तिच्या वडिलांच्या पहिल्या भेटीबद्दल किस्साही तिने सांगितला. रकुलचे



वडील भारतीय लष्कराचे निवृत्त अधिकारी आहेत. जॅकी व तिच्या वडिलांसोबतच्या पहिल्या भेटीबद्दल बोलताना ती म्हणाली, माझे वडील फार कडक नाहीत, पण त्यांना शिस्त आवडते. जेव्हा जॅकी व माझे वडील पहिल्यांदा भेटणार होते, तेव्हा मलाच जास्त काळजी वाटत होती. जेव्हा ते जॅकीला भेटले तेव्हा त्यांनी थेट जॅकीचीच चौकशी सुरू केली. मात्र, जॅकी यासाठी आधीच तयार होता, असे रकूलने सांगितले. या मुलाखतीत तुला जॅकीची कोणती सवय आवडत नाही, असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देत ती म्हणाली, जॅकी वक्तशीर नाही, तो वेळ पाळत नाही, पण मी खूप वक्तशीर आहे. मला ही सवय माझ्या वडिलांकडून लागली. सुरुवातीला जेव्हा जॅकी पाच मिनिटांत येतो म्हणायचा तेव्हा तो तासभर लावायचा. मात्र, आता त्याच्यात सुधारणा झाली आहे. आता त्याचे पाच मिनिटं म्हणजे २० मिनिटं असतात. रकुलच्या वर्कफ्रंटबाबत बोलायचे झाल्यास, गेल्या वर्षी तिचा 'छत्रीवाली' चित्रपट प्रदर्शित झाला. तसेच काही दिवसांपूर्वी ती 'आयलन' या चित्रपटात झळकली होती. मात्र, बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट फ्लॉप ठरला. आता लवकरच ती 'इंडियन २' आणि 'रामायण' या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.

## सिद्धार्थमध्ये लग्नानंतर आली ही शक्ती!

मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय जोडींपैकी एक म्हणजे सिद्धार्थ चांदेकर व मिताली मयेकर. मराठीतील हे क्यूट कपल नेहमी चर्चेत असतं. २४ जानेवारी २०२१ साली दोघांनी लग्नगाठ बांधली होती. मोठ्या थाटामाटात सिद्धार्थ व मितालीचा लग्नसोहळा पार पडला होता. पण लग्नाच्या तीन वर्षांनंतर सिद्धार्थमध्ये काय बदल झाले, जाणून घ्या...



सिद्धार्थ नुकताच एका कार्यक्रमात सहभागी झाला होता. तेव्हा त्याला विचारण्यात आलं की, लग्नानंतर तुझ्यात काय बदल झाले? यावर तो म्हणाला, की माझ्या कपाटाच्या साइजमध्ये खूप बदल घडलेला आहे. तसंच मी आधी सतत काळजी, चिंता करणारा माणूस होतो. आता ते माझं सतत चिंता करण्याचं प्रमाण कमी झालंय. शांतता आली असं वाटतंय. याशिवाय मी माझ्या लग्नानंतर कामाकडे जास्त लक्ष देऊ लागलो. मिताली माझ्या करिअरसाठी अत्यंत लकी ठरली, असे तो म्हणाला. आता माझ्या करिअरची गाडी धावतेय. मला आता ती थांबेल किंवा बिघडेल या गोष्टींची भीती नाहीये. महत्त्वाचं म्हणजे लग्नानंतर मला अपयशी होण्याची भीतीच वाटतं नाही. कधी ना कधीतरी अपयश येणारच आहे. मात्र अपयश येऊ नये यासाठी माझे हात आताच थरथरत नाहीयेत. मला अपयश आलं तर तेव्हा जे काही दुःख होईल, त्रास होईल या सगळ्याला मी सामोर जाऊ शकतो. मी खूप हसत-खेळत असं नाही म्हणणार. पण मी सामोर जाऊन पुन्हा कमबॅक करेन. लग्नानंतर ही माझ्यात शक्ती आली आहे, असं सिद्धार्थ म्हणाला.

## हैराण व्हाल... ॲटली कुमारला मिळणार 'इतके' मानधन!

'झुकेगा नहीं' म्हणत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा 'पुष्पा' म्हणजेच अल्लू अर्जुन हा सध्या चांगलाच चर्चेत आहे. कोविड काळात या चित्रपटाचा पहिला भाग आला होता ज्याला प्रेक्षकांनी अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. आता अल्लू अर्जुन, रश्मिका मंदान्ना आणि फहाद फासिल यांच्या बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित 'पुष्पा २' या चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट बघत आहेत. हा चित्रपट यावर्षी ऑगस्ट महिन्यात रिलीज होण्यासाठी सज्ज आहे.



अल्लू अर्जुन लवकरच 'जवान'चा दिग्दर्शक ॲटलीच्या आगामी चित्रपटातही झळकणार आहे. 'जवान'च्या जबरदस्त यशानंतर आता ॲटली त्याचा पुढचा चित्रपट अल्लू अर्जुनबरोबर करणार असल्याची चर्चा आहे. सध्या या चित्रपटाची तयारी जोरदार सुरू आहे. नुकतंच याबद्दल एक नवी अपडेट समोर आली आहे. मीडिया रिपोर्टनुसार अल्लू अर्जुनबरोबरच्या या चित्रपटासाठी ॲटलीने चांगलेच मानधन आकारले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार या चित्रपटासाठी ॲटली कुमारला तब्बल ६० कोटींचे मानधन देण्यात येणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आजवर कोणत्याही दिग्दर्शकाला एवढी मोठी रक्कम मानधन म्हणून कधीच दिलेली नव्हती. परंतु ॲटली कुमारच्या आधीच्या चित्रपटांचे कलेक्शन पाहता त्याला एवढी रक्कम देणं योग्य असल्याचंही सांगण्यात येत आहे. अद्याप याबद्दल कोणीही अधिकृत भाष्य केलेलं नाही. जर हे वृत्त खरं असेल तर ॲटली कुमार हा सर्वात महागडा दिग्दर्शक बनू शकतो, असं सांगण्यात येत आहे. अल्लू अर्जुन आणि ॲटली कुमारच्या या चित्रपटाचं प्री-प्रोडक्शनचं काम सुरू आहे. लवकरच अल्लू अर्जुन या चित्रपटाची घोषणा करू शकतो असंही सांगितलं जात आहे. ॲटलीने नुकतंच शाहरुख खानबरोबर 'जवान'सारखा चित्रपट देऊन बॉक्स ऑफिसवर एक वेगळाच इतिहास रचला. त्यामुळे प्रेक्षक त्याच्या आगामी प्रोजेक्टची आतुरतेने वाट बघत आहेत.

## शाहरुख, रणवीरला जन्नतने टाकले मागे!

लहानपणी मनोरंजनसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या अनेक अभिनेत्री आहेत. त्या अभिनेत्रींनी पुनरागमन करत इंडस्ट्रीमध्ये आपली नवी ओळखही निर्माण केली आहे. आलिया भट्टपासून ते श्रीदेवीपर्यंत अनेक अभिनेत्रींनी लहान वयातच आपल्या करिअरची सुरुवात केली. जन्नत जुबैर हे त्यातलंच एक नाव आहे.

जन्नतने वयाच्या सातव्या वर्षी 'चांद के पार चलो' या मालिकेतून इंडस्ट्रीमध्ये पदार्पण केलं. 'काशी- अब ना रहें तेरा कागज कोरा' आणि 'फुलवा' या मालिकांमुळे प्रसिद्धी मिळाली. 'लव्ह का दि एंड' या चित्रपटात जन्नतने श्रद्धा कपूरच्या लहान बहिणीची भूमिका साकारली होती. यामुळे तिला लोकप्रियता मिळाली. जन्नत सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते व तिला लाखो करोडो चाहते फॉलो करतात. फॉलोअर्सच्या स्पर्धेत जन्नतने सुपरस्टार शाहरुख खानलासुद्धा मागे टाकलं आहे. जन्नतच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर ४९.२ मिलियन फॉलोअर्स आहेत, तर शाहरुख खानचे ४६.६ मिलियन फॉलोअर्स आहेत. या गोष्टीत जन्नतने करिना आणि सारा अली खानलासुद्धा मागे टाकलय. साराचे इन्स्टाग्राम अकाउंटवर ४५ मिलियन फॉलोअर्स आहेत, तर करिना कपूरचे १२ मिलियन फॉलोअर्स आहेत. जन्नतची नेटवर्थ २५ कोटी आहे अशी चर्चा आहे. जन्नत महिन्याला २५ लाखांपर्यंत कमावते. महितीनुसार, 'खतरों के खिलाडी'मधली सर्वात जास्त मानधन घेणारी स्पर्धक जन्नत होती. एका एपिसोडसाठी जन्नत १८ लाख रुपये मानधन घेत होती. दरम्यान, जन्नतने वयाच्या २१ व्या वर्षी मुंबईत स्वकमाईने घर घेतलं. जन्नत इन्स्टाग्रामबरोबरच युट्यूबवरसुद्धा सक्रिय असते. तिची ओळख कन्टेन्ट क्रिएटर अशीही असल्याने ती निरनिराळे फोटोज आणि व्हिडीओज आपल्या चाहत्यांसह शेअर करत असते.



## शॉर्ट न्यूज

### गीतांजली व्यवहारे हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**कोपरगाव :** येथील एस. के. सोमय्या - विद्यामंदिर विद्यालयातील इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी गीतांजली शरद व्यवहारे ही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत आली आहे. याकामी तीला वर्गशिक्षिका श्रीमती गवळी, श्रीमती भालदंड, जाधव, श्री. इधाते यांचे मार्गदर्शन लाभले. यापूर्वीही तिने मंथन प्रज्ञाशोध परीक्षा आणि सीव्ही रमण बाल वैज्ञानिक स्पर्धेत यश मिळविले होते. तिचे आई वडील शिक्षक असून या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### वृक्षसंवर्धन काळाची गरज: अरगडे

**निळवंडे :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन आजच्या काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन वडगाव पान येथील बडोदा बँक शाखेचे प्रबंधक सागर अरगडे यांनी केले. निळवंडे (ता. संगमनेर) येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात माध्यमिक विद्यालयात बँक ऑफ बडोदाच्या ११७ व्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक श्रीकांत माघाडे, योगेश वाळुज अमोल काकड, उमेश मोरे, सागर थेटे, डॉ. विजय कुऱ्हाडे, सचिन पवार उपस्थित होते.

### डॉ. बाबुराव उपाध्ये यांची कथा अभ्यासक्रमात

**टाकळीभान :** डॉ. बाबुराव उपाध्ये यांची कथा अभ्यासक्रमात समाविष्ट झाली, हे विशेष गौरवास्पद असल्याचे मत मराठी साहित्य कथालेखक, समीक्षक, प्रकाशक डॉ. शिवाजी काळे यांनी व्यक्त केले. साहित्य परिवार, टाकळीभान यांच्यातर्फे डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्या माकडांच्या हाती शाळेची खिचडी या कथासंग्रहातील आणि कमल सापडली ही कथा - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत एस. पी. कॉलेज, पुणे स्वायत्त महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष कला शाखेत अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्याबद्दल त्यांचा सत्कार व परिसंवाद प्रसंगा डॉ. शिवाजी काळे बोलत होते.

### भोजापूर धरणात मृत पाणीसाठाच शिल्लक

**संगमनेर :** तालुक्यातील दुष्काळग्रस्त निमोण पट्ट्यातील गावांना वरदान ठरलेल्या भोजापुर धरणाने ऐन पावसाळ्यातही तळ गाठला आहे. या धरणा अवघा मृत पाणीसाठा शिल्लक आहे. भोजापुर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने दडी मारली असून म्हाळुंगी नदी कोरडीठाक आहे. त्यामुळे पावसाळा सुरू होऊन दीड महिना लोटला तरी धरणात पाणीसाठा होऊ शकला नाही. सहाजिकच लाभक्षेत्रातील शेतकरी वर्ग चिंतेचे वातावरण पसरले आहे.

### राज्यातले सरकार घोषणांचा पाऊस पडणारे

**राहुरी :** राज्याचे सध्याचे सरकार हे फक्त घोषणाचे पाऊस पाडणारे सरकार आहे, अशी टीका करून आपण मागील पाच वर्षात विकासकामे केली, त्या कामाचा हिशोब मतदारराजा चुकता करून विरोधकांना त्यांची जागा दाखवून देईल, असा विश्वास आमदार लहू कानडे यांनी व्यक्त केला. राहुरी तालुक्यातील ३२ गावातील प्रवरा काठावरील आंबी येथील अंगणवाडी व शिवकन्या बचतगट कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिवाजीराव कोळसे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

# समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी शिक्षण संवाद यात्रा !

## ॲड. संग्रामसिंह शेवाळे यांनी केले शिक्षण संवाद यात्रेचे आयोजन

**शिरुर : प्रतिनिधी**

**शिक्षण संवाद यात्रा ही केवळ यात्रा नाही, तर आपल्या उज्ज्वल भविष्याची वाट दाखविणारी ज्ञानरुपी मशाल आहे. आपल्या शिक्षणाच्या आणि करिअरच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना दूर करण्यासाठी आणि नवे ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास मिळविण्यासाठी ही यात्रा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे, असे प्रतिपादन ॲड. संग्रामसिंह शेवाळे यांनी केले.**

ॲड. संग्रामसिंह शेवाळे यांनी आयोजित केलेली ''शिक्षण संवाद यात्रा'' शिरूर तालुक्यातील विविध भागातून गावांमधून जाणार आहे, आपल्या मुलांच्या स्वप्नांना व आयुष्याला आकार देण्यासाठी या शिक्षण यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी श्री. शेवाळे यांनी केले.

आपल्या महापुरुषांनी शिक्षणाचे महत्व पटवून देत संपूर्ण आयुष्य यासाठी खर्च केलं आहे. त्यांच्या कार्यामुळे आज आपण शिक्षण क्षेत्रात प्रगती करत इथर्यंतचा टप्पा टाकला आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. सध्याच्या काळात फक्त साक्षर होऊन चालणार नाही तर उच्च व दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण घेतल्याशिवाय पर्याय नाही असे सांगून श्री. शेवाळे पुढे म्हणाले, भारतात व परदेशात नामांकित संस्थामध्ये जाऊन उच्च शिक्षण घेण्याची अनेकांची इच्छा असते परंतू मार्गदर्शनाअभावी विद्यार्थी तिथपर्यंत पोहचत नाहीत.



मी लंडन येथे शिक्षण घेत असताना याठिकाणी शिक्षणासाठी सामान्य घरातील भारतीय विद्यार्थी खूपच कमी दिसून आले. ग्रामीण भागात माहितीचा अभाव, पुरेसे मार्गदर्शन न मिळणे, आर्थिक अडचणी, आदींमुळे विद्यार्थ्यांत उच्च शिक्षणाबाबतचा निरुत्साह वाढताना दिसत आहे. सामान्य कुटुंबातील होतकरू विद्यार्थ्यांना देशातील व परदेशातील उच्च शिक्षणाची दारे खुली करण्याच्या मुख्य उद्देशाने आम्ही शिक्षण यात्रेचे आयोजन करत आहोत. शिक्षण संधीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी शिक्षण यात्रा काढून या यात्रेत फेलोशिपबाबतची माहिती आणि सध्याची आव्हाने याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. देश-विदेशातील नामांकित विद्यापीठे, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती तसेच फेलोशीपबाबत माहिती व नेतृत्व कौशल्य विकसित व्हावे, या हेतूने उच्चशिक्षणाचा जागर करणारी शिक्षणयात्रा काढली जाणार आहे.

आज जागतिक पातळीवर वाढलेल्या स्पर्धात्मक युगात सामर्थ्यवान राष्ट्र निर्माण करण्यासाठी तितकीच सक्षम आणि बुद्धिमान भारतीय तरुणांची फळी निर्माण करणे गरजेचे आहे. ही केवळ यात्रा नाही, तर आपल्या उज्ज्वल भविष्याची वाट दाखविणारी ज्ञानरुपी मशाल आहे. आपल्या शिक्षणाच्या आणि करिअरच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना दूर करण्यासाठी आणि नवे ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास मिळविण्यासाठी ही यात्रा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे, असेही श्री. शेवाळे यांनी सांगितले.

## वाचकांच्या लेखणीतून

### सुजलेल्या गालाचे रहस्य

१९८४ साल होते. त्यावेळेस मी बँक ऑफ इंडियाच्या मुंबई सेंट्रल शाखेत नोकरी करीत होतो. संध्याकाळी ४ वाजता बँकेतून सुटल्यावर मरीन लाईन्सच्या एसएनडीटी महाविद्यालयात पत्रकारितेच्या वर्गाला मी हजर होत असे. या पत्रकारिता वर्गातले काही मनोरंजक किस्से वाचण्यासारखे आहेत. आमच्या पत्रकारिता वर्गाचा तो पहिलाच दिवस होता. प्रत्येक विद्यार्थी व्यासपीठावर येऊन आपापला परिचय करून देत होता.



एक विद्यार्थी उठून व्यासपीठावर जाऊन उभा राहिला. त्याचा डावा गाल सुजला होता. तो सांगू लागला,
माझे नाव.....मी वसईला राहतो... माझा सुजलेला गाल पाहून तुम्हाला प्रश्न पडला असेल. त्याचा किस्सा सांगतो. मला भाषण करण्याची भारीच हौस. मी एका ठिकाणी सभेत भाषण करीत होतो. अनवधानाने माझी जीभ घसरली आणि मी सभेत नको ते बोलून गेलो! त्यामुळे श्रोते माझ्यावर भलतेच भडकले! एवढंच नव्हे; तर त्यांनी मला बदड बदड बदडलंसुध्दा! माझा गाल सुजला आहे. ही त्याचीच निशाणी आहे! तेव्हापासून सभेत कसं बोलू नये, ते मला समजलं! ते ऐकून आम्ही सगळेच खो खो हसत सुटलो! तो विद्यार्थी चांगलाच वक्ता असावा याचीही खात्री पटली. त्याचा स्पष्टवक्तेपणा तर फारच भावला!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# वनदेव निसर्ग परिचय केंद्र नटले हिरवाईने !

## पर्यटकांनी केली गर्दी | जोरदार पावसामुळे शिरसाटवाडी व कुत्तरवाडी प्रकल्प भरले


**पाथर्डी : प्रतिनिधी**

**समाधानकारक पावसामुळे तालुक्यातील प्रमुख प्रकल्पांपैकी शिरसाटवाडी व कुत्तरवाडी प्रकल्प पूर्णपणे भरले आहेत. शहराजवळील वनदेव निसर्ग परिचय केंद्राचा परिसर अत्यंत रमणीय व आल्हाददायक बनला असून, शहरवासीयांची वर्दळ या भागात वाढली आहे.**

शहरातील हजारो नागरिक सकाळ-सायंकाळ वनदेव निसर्ग परिचय केंद्राच्या बाजूला भटकंतीसाठी जातात. या भागात विविध प्रकारचे वन्य प्राणी विशेषतः ससे, हरिण, मुंगूस, पाण कोंबड्या आदींचा वावर वाढला आहे. वनदेव परिसरातील सर्वच बंधारे पूर्ण भरले असून, संपूर्ण परिसर हिरवाईने नटला आहे. पहाटेच्या वेळी फिरायला येणाऱ्या लोकांना गाव तळ्यापासूनच निसर्गाच्या चैतन्याची व प्रसन्नतेची अनुभूती येते. गावतळी पूर्ण भरली आहेत. रानवेली, रानफुलांचा सुगंध घेत पुढे चालत वनदेवाच्या कमानीपर्यंत चढउताराने जाता येते. त्यापुढे पक्षीकट्टा असून, येथे व दगड खाणीच्या परिसरात अनेक नागरिक कावळे, चिमण्या व अन्य पक्षांना खाद्य टाकतात. तसेच काही जण किड्या मुंग्यांसाठी अन्नपदार्थ टाकतात.

या भागात मोठ्या प्रमाणावर वनौषधी असून, पचनसंस्थेसह मधुमेह आजारावर गुणकारी सिद्ध असलेल्या शेंदूळ माकड या वनस्पतीसह इतर रान वनस्पती व भाज्या डोंगरदऱ्यात फिरून लोकांकडून गोळा केल्या जातात. टणटणी, पळस, रानमोगरा, बेल, आघाडा, दुर्वा यांसह हिरवेगार गवत पाहून वेगळीच प्रसन्नता वाटते. सकाळच्या वेळी उगवणारा सूर्य, बाजूने ढगांची गर्दी, लांब क्षितीजाच्या पलीकडे निळे आकाश, असे बहुरंगी वातावरण मनाची प्रसन्नता वाढवते. योग साधना, व्यायामासाठी या भागांमध्ये फिरणाऱ्यांची आता वर्दळ वाढली आहे.

पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांची वर्दळ दिवसभर असते.



वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुप, सुवर्णयुग तरुण मंडळ, यांसह शहरातील वृक्षसंवर्धन चळवळीचे विविध कार्यकर्त्यांकडून या भागात निसर्ग संगोपनाचे कार्य सेवाभावी पद्धतीने केले जाते. यामध्ये डॉक्टर, इंजिनियर, वकील, उद्योजक, पोलीस अधिकारी, महसूल अधिकारी, पंचायत समितीचे कर्मचारी अधिकारी, व्यापारी अशा सर्वच थरातील जागरूक नागरिकांचा समावेश आहे. विविध टेकड्यांवरून फिरताना पशुपक्ष्यांची शीळ, किलबिलाट ऐकत शांत चित्ताने गिरी भ्रमणही अनेकांकडून केले जाते.

सायंकाळच्या वेळी साप, नाग व अन्य हिंसक प्राण्यांचा वावर वाढत असल्याने वनदेव परिसराऐवजी धामणगाव देवी मंदिर परिसरापर्यंत फिरणारे गर्दी करतात. उन्हाळ्यामध्ये घरून बाटलीभर पाणी आणत अनेकांनी अनेक झाडे जगविली. नैसर्गिक वाढ या भागात झाडांची होत नसल्याने फार मोठी झाडे झाली नाहीत, तरीही वन विभागाने तंत्रशुद्ध पद्धतीने वृक्षारोपण केले, तर झाडी वाढून वनदेव निसर्ग परिचय केंद्र जिल्ह्यात प्रेक्षणीय स्थळ म्हणून नावारूपाला येईल. येथील बालोद्यानातील खेळणीची दुरुस्ती करण्याची नागरिकांची मागणी आहे.

# नगर अर्बन बँकेची ३१ कोटीची वसूली

## थकीत कर्जवसूलीची प्रक्रिया सुरु

**नगर : प्रतिनिधी**

**रिझर्व बँकेने नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा बँकिंग परवाना रद्द केल्यानंतर केंद्र शासनाने बँकेवर नोव्हेंबर २०२३ मध्ये अवसायक म्हणून एनसीडीसीचे उपसंचालक गणेश गायकवाड यांची नियुक्ती केली होती. दरम्यानच्या आठ महिन्यांच्या कालावधीमध्ये २० जुलै अखेर बँकेच्या एकुण कर्जापैकी रुपये ३० कोटी ८६ लाख वसूल करण्यात आले आहेत. थकीत कर्ज वसुलीला आणखी गतिमान करण्यासाठी बँक प्रशासनाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार एकरकमी कर्ज परतफेड योजना ५ जूनपासून सुरू केली आहे.**




या योजनेस थकीत कर्जदारांचा प्रतिसाद मिळत आहे. ओटीएस योजनेत सहभागी होण्यासाठी एका महिन्यात २३९ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १४ कर्जदारांनी आतापर्यंत १०० टक्के रक्कम रुपये ३ कोटी ८९ लाख २९ हजार रुपये भरले आहेत. ५ कर्जदारांनी ओटीएसमध्ये ठरलेल्या अंतिम रकमेच्या २५ टक्के रक्कम रुपये ६ लाख ८७ हजार रुपये भरली आहे. उर्वरित रक्कम देखील लवकरच ठरल्याप्रमाणे जमा होणार आहेत. त्याचबरोबर डीआयसीजीसीच्या तिसऱ्या क्लेमच्या माध्यमातून १७ हजार ४२४ ठेवीदारांना ६३.१५ कोटी लवकरच देण्यात येणार असल्याची माहिती एनसीडीसीचे संचालक तथा बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच पोलीस प्रशासनामार्फत देखील थकीत कर्ज वसुलीची प्रक्रिया सुरू आहे. सर्व थकीत कर्जदारांनी या एक रकमी परतफेड (ओटीएस) योजनेचा लाभ घेऊन संभाव्य कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी आपली थकबाकीची रक्कम लवकरात लवकर भरून बँक प्रशासनास सहकार्य करावे, तसेच सर्व खातेदार व ठेवीदार यांनी आपापले केवायसी कागदपत्र नजीकच्या शाखेत जमा करून ठेवी परत मिळवण्यासाठी क्लेम फॉर्म देखील लवकरात लवकर भरून द्यावेत, असे आवाहन अवसायक गायकवाड यांनी केले आहे. थकीत कर्जाची वसुली करून ठेवीदारांना त्यांचे कष्टाचे पैसे परत करण्यासाठी बँक प्रशासन प्रयत्नशील असल्याचे देखील यावेळी गायकवाड यांनी सांगितले.

### (पान १ वरून) अर्थसंकल्पानंतर शिंदे सरकारचे ६ धडाकेबाज निर्णय!

असलेली राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवण्याचा आणि मेंढपाळ लाभार्थींना रक्कम थेट खात्यात जमा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्यातील धनगर समाजातील मागासलेपण दूर करण्याच्या उद्देशाने ही योजना २०१७ वर्षापासून सुरु होती. या योजनेत अधिकाधिक लाभार्थींना फायदा व्हावा म्हणून काही बदलासह त्यास मान्यता देण्यात आली. या वर्षासाठी महामंडळाकडे असलेल्या २९ कोटी ५५ लाख इतका निधी चालू वित्तीय वर्षात खर्च करण्यास आणि त्यानंतर ही योजना दरवर्षी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार पुढे चालू ठेवण्यात येईल. पशुधन खरेदीच्या बाबतीत ७५ टक्के अनुदानाची रक्कम ७ दिवसात थेट लाभ हस्तांतरण प्रक्रीयेतून (डीबीटी) लाभार्थींना देण्यात येईल. तसेच चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातीचे ठोंबे व बियाणे यासाठीचे अनुदान वगळता उर्वरित सर्व लाभ डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थींना देण्यात येतील.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
• प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
• गर्भपिशवीचे आजार
- अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
• Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
• स्तनांचे आजार आणि उपचार
• PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
• सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे (म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था | एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# टाकळी ढोकेश्वर येथे शिष्यगण मेळाव्याचे आयोजन

## राज्य ,परराज्यातील शिष्यगणांची उपस्थिती




**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे श्री रामदास भाऊसाहेब बांडे शिष्य मंडळ आयोजित गुरुपौर्णिमा उत्सव २०२४ शिष्यगण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी रामदास बांडे महाराज यांचे संपूर्ण महाराष्ट्रातून शिष्यगण तसेच महाराष्ट्राच्या बाहेरील देखील शिष्यगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

या कार्यक्रमासाठी नगर दक्षिणचे खा. नीलेशजी लंके यांच्या पत्नी राणीताई लंके या उपस्थित होत्या त्यांनी उपस्थित शिष्यगण व ग्रामस्थांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कु. अथर्व महेश बांडे याचा वाढदिवस व अनुग्रह कार्यक्रम संपन्न झाला त्यानंतर ह भ प गोरक्षनाथ महाराज रोकडे यांचे सुश्राव्य कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला त्यानंतर परिसरातील तसेच परगावातील गरजवंतांना वस्त्र वाटप कार्यक्रम घेण्यात आला

त्यानंतर शाहीर आण्णासाहेब चौरे सर शाहीर शांताराम किंकर तसेच संगीत रत्न भाऊसाहेब आंधळे यांचा भेदिकाचा कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचा कार्यक्रम होऊन शिष्यगण मेळाव्याची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके, टाकळी ढोकेश्वर गावच्या सरपंच अरुणा खिलारी, उपसरपंच किरण तराळ, माजी उपसरपंच विलास झावरे, माजी सरपंच सुनिता झावरे, जयसिंग झावरे, अंकुश पायमोडे, महेश पाटील, मळीभाऊ रांधवन, गंगाराम बांडे, बंडूशेठ रांधवन, महेश बांडे, आप्पा झावरे, अनिल माकरे ,यांच्यासह महाराष्ट्रातून आलेले शिष्य गण व समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर हे मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# धनश्री फंडने आशियाई स्पर्धेत पटकावले सुवर्णपदक

## श्रीगोंदा तालुक्यातीत जल्लोष साजरा




**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**थायलंड येथे झालेल्या आशियाई चॅम्पियनशिप अंडर-२० महिलांच्या कुस्ती स्पर्धेत श्रीगोंद्याची सुवर्णकन्या धनश्री फंड हिने ५५ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले. अंतिम फेरीत जपानची युना हिच्यावर ६-४ अशी मात करून धनश्रीने सुवर्णपदकावर नाव कोरले. आंतरराष्ट्रीय स्तरावर तिने हे दुसरे पदक मिळविले आहे. धनश्रीने सेमीफायनलमध्ये चीनची लुईझुवान चेन हिच्यावर १३-१० अशी मात करून अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला होता. अगोदरच्या फेरीत तिने कझाकस्तानची अझिझा शुमकारोमा हिच्यावर १२-२ अशी मात केली होती.**

धनश्रीचे आंतरराष्ट्रीय पातळीवर हे पहिलेच सुवर्णपदक आहे. धनश्री फंड ही श्रीगोंदा शहरातील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. इंटरनॅशनल कुस्ती संकुलाचे प्रमुख हनुमंत फंड यांची ती कनिष्ठ कन्या आहे. धनश्रीची मोठी बहीण भाग्यश्री फंड देखील आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी कुस्तीपटू म्हणून प्रसिद्ध आहे. तिने दोन वेळा महिला महाराष्ट्र केसरी होण्याचा बहुमान मिळवला आहे. ही माहिती समजताच श्रीगोंदा तालुक्यात जल्लोष करण्यात आला.

# एमईटी स्कूलमध्ये गुरू पौर्णिमा उत्साहात साजरी

## सुमुधर गायनाने उपस्थित मंत्रमुग्ध



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा येथील माऊली एज्युकेशन ट्रस्टच्या एमईटी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये सोमवार, २२ जुलै २०२४ रोजी गुरू पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे, देशमुख सर प्राचार्य कृषी विद्यालय, प्राचार्या सौ. मोनाली अनिकेत पठारे, उपप्राचार्या सौ. अनिता शर्मा तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात अनिकेत पठारे व सौ.मोनाली पठारे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलित करून करण्यात आली. पूजनामुळे कार्यक्रमाचे वातावरण मंगलमय झाले. सुरेश खेत्रे आणि पीटर यांच्या सुमधुर आवाजाने उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला आणि कार्यक्रमाची शोभा वाढवली.

विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरूचे महत्त्व सांगितले. इयत्ता ९ वीच्या दिक्षा घोडेकर, ७ वीच्या प्रतीक्षा शिंदे आणि प्रणव गवळी यांनी आपल्या ओजस्वी भाषणातून गुरूंचे महत्त्व आणि गुरूंच्या शिक्षणाचे स्थान विषद केले. विद्यार्थ्यांनी आपापल्या भाषणातून गुरूंच्या आशीर्वादामुळे आयुष्यात येणाऱ्या सकारात्मक बदलांचा उल्लेख केला.

शिक्षकांमधून महेश साबळे आणि सुरेश खेत्रे यांनी आपल्या भाषणातून गुरू पौर्णिमेचे महत्त्व सांगितले. त्यांनी गुरूंच्या योग्य मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील बदलांविषयी बोलले. त्यांनी विद्यार्थ्यांना गुरूंच्या शिकवणीचे अनुसरण करण्याचे महत्त्व पटवून दिले.

संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे सर यांनी आपल्या भाषणातून गुरूचे स्थान आणि शिष्य कसा असावा याविषयी माहिती दिली. त्यांनी एकलव्याची गोष्ट सांगून विद्यार्थ्यांना गुरुभक्ती आणि निष्ठेचे महत्त्व पटवून दिले. पठारे सरांच्या भाषणातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आणि त्यांनी गुरूंच्या मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणे अभ्यास करण्याचे ठरविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सृष्टी भांड आणि उत्कर्षा जवक ह्या विद्यार्थिनींनी केले. त्यांनी आपल्या ओजस्वी निवेदनाने कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी संदीप गायकवाड सर यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.

# अण्णा हजारेंची शाबासकी उर्जादायी : विद्या पवळे

## विद्यार्थ्यांच्या सन्मान हा शिक्षकांचा गौरव



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर येथे संपन्न झालेल्या २४व्या नॅशनल लेवल अबॅकस कॉम्पिटिशनमध्ये नारायणगव्हाण अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या कॉम्पिटिशन मध्ये अगदी पाच मिनिटांमध्ये गणिताची बेरीज वजाबाकी गुणाकार भागाकार अशी उदाहरणे सोडवली. या कॉम्पिटिशन मध्ये दोन हजार विद्यार्थी सहभागी होते.या अति तटीच्यास्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी अगदी जीव ओतून उदाहरणे सोडवून उत्तम असे यश संपादन केले.**

यामध्ये विद्या शेळके,अनुष्का शेळके सरोदे कृष्णा, खोले वैष्णवी, राजवर्धन शेळके, पवळे राणा, भोसले श्रवण, फटांगडे आरोही, चव्हाण स्वरांजली, शेळके श्रेया, सुपेकर यश, फटांगडे हर्षल, देवश्री शेळके, शेळके पार्थ, शेळके रिद्धी या विद्यार्थ्यांनी उत्तुंग असे यश मिळवलेले आहे. यामध्ये मोलाचे मार्गदर्शन रेशमा कळमकर, कल्पना घडेकर यांसह सहकाऱ्यांचे लाभले.

गुरु पूर्णिमेचे औचित्य साधून पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते या नॅशनल कॉम्पिटिशनचे बक्षीस वितरण केले गेले. या प्रसंगी अण्णा हजारेंकडून केलेल्या मार्गदर्शनातून मुलांना नवीन प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातही प्रगती करावी असे मार्गदर्शन अण्णांनी केले. विद्यार्थी हेच राष्ट्राची खरी संपत्ती असून, त्यांची शैक्षणिक होणारी उन्नती हीच राष्ट्राची खऱ्या अर्थाने प्रगती आहे असे आशीर्वाद रुपी कौतुकाची थाप टाकत अण्णांनी विद्यार्थ्यांचा सन्मान केला.

> **ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण करून आधुनिक शिक्षण प्राप्त करून देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत राहणार असुन विद्यार्थांना मिळणारे यश हिच आमच्या कामाची खरी पावती आहे, आजच्या व्यवहारात गणित हा अत्यंत महत्वाचा भाग असुन एव्हरेस्ट ॲबॅकस ॲकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थांना कॅल्युलेटरपेक्षाही जास्त स्पिडने गणिते सोडवत आहेत विद्यार्थ्यांना मिळालेले यश आणि त्यांचा होणार सन्मान हाच आमचा खऱ्या अर्थाने गौरव आहे.**
>
> **-विद्या पवळे**
> **(ॲबॅकस शिक्षिका)**

# विशाळगड येथील घटनेचा बोधेगावात निषेध

## मुख्य सुत्रधारावर कारवाईची मागणी



**शेवगाव : प्रतिनिधी**

**कोल्हापूर जिल्ह्यात विशाळगड येथे घडलेल्या हल्ल्याचा शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे निषेध करण्यात आला. याबाबतचे निवेदन सर्व मुस्लिम, दलित व बहुजन समाज बांधवांच्या वतीने बोधेगाव पोलीस दूरक्षेत्रातील पोलिसांना देण्यात आले.**

कोल्हापूर जिल्ह्यात विशाळगड परिसर व गाजापूर येथे जी घटना घडली, ती अत्यंत दुर्दैवी असून येथील अल्पसंख्याक असणाऱ्या मुस्लिम समाज बांधवावर जो भ्याड हल्ला झाला आहे. त्या घटनेचा मुख्य सूत्रधार कोण आहे, त्यास तात्काळ शोधून काढावे व कठोर शिक्षा करावी.

निवेदनावर काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश बाप्पू भोसले, वंचितच्या महिला तालुका प्रमुख संगीता ढवळे, मौलाना हापिज माजिद मिर, मुक्ती रशीद शेख, शफिक हाजी शेख, शाहूराव खंडागळे, अनिस सय्यद, श्रीधर भोंगळे, मोहन भोंगळे, अरुण झांबरे, राजू बनसोडे, गुलाब सय्यद, जावेद पठाण, बाबा गिरी, वाल्मिक चव्हाण, बाळासाहेब भोंगळे, राम भोंगळे, नितीन धोत्रे, पवन मिसाळ, शोहेब शेख आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# रवींद्र गायखे यांची राष्ट्रवादीच्या जिल्हा युवक उपाध्यक्षपदी निवड

## पक्षनिष्ठेला मिळाला न्याय ; खा.लंकेंचे खंदे समर्थक

**पारनेर : प्रतिनिधी**

**गेले अनेक वर्षापासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नगर दक्षिणचे नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांचे कट्टर समर्थक म्हणून तालुक्यात परिचित असलेले सावरगाव येथील रवींद्र गायखे यांची सामाजिक व राजकीय कार्याचा विचार करत व संघटनात्मक कार्यात नेहमीच अग्रभागी असलेले युवा नेतृत्व म्हणून रवींद्र गायके पाटील यांची खासदार लंके यांच्या शिफारसीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक जिल्हा उपाध्यक्षपदी नुकतीच निवड जाहीर करण्यात आली.**

जिल्हा परिषद सुपा गटाच्या वतीने खासदार नीलेश लंके यांचा खासदार झाल्यानंतर प्रथमच भव्य नागरी सत्काराचे आयोजन शनिवारी वाडेगव्हाण येथे करण्यात आले होते .सदर समयी त्यांना सन्मानित करत जिल्हा कार्यकारिणीवर पक्षाचे काम करण्याची संधी देत नियुक्तीपत्र देण्यात आले . खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे अहमदनगर जिल्हा अध्यक्ष रामेश्वर निमसे यांच्या हस्ते देण्यात आले.

पारनेर तालुक्यातील सावरगाव सारख्या ग्रामीण भागामध्ये सर्वसामान्य कुटुंबात जन्म झाल्या नंतर समाजकारणात राजकारणात सक्रिय राहत गेल्या पंधरा वर्षांपासून सावरगाव ग्रामपंचायत सदस्य असलेले व राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे पारनेर तालुका उपाध्यक्ष म्हणून तर नीलेश लंके यांचे कट्टर समर्थक म्हणून काम करत असलेले रवींद्र गायखे यांना राष्ट्रवादी पक्षाने एकनिष्ठतेला पदाच्या माध्यमातून न्याय दिला असल्याची भावना सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होत आहे. खासदार नीलेश लंके यांनी त्यांचे अभिनंदन करीत निवडीचे पत्र दिले.

यावेळी युवक जिल्हाध्यक्ष रामेश्वर निमसे सभापती पारनेर बाजार समिती बाबाजी तरटे ,निलेश लंके प्रतिष्ठानचे प्रांताध्यक्ष सुदामराव पवार निलेश लंके प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष कारभारी पोटघन तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी व जिल्हा परिषद सुपा गटातील ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



> **खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून काम करत असताना सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याचे भाग्य मिळते पुरोगामी विचारांचा वारसा घेऊन काम करणारे शरदचंद्र पवार हे खऱ्या अर्थाने आमच्या युवकांसाठी प्रेरणास्थान आहेत. ही प्रेरणा घेऊन खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढील काळात जिल्ह्यात काम करणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे विचार व कार्य जिल्ह्याच्या शेवटच्या घटका पर्यंत पोहोचवण्यासाठी आणि पक्ष संघटन वाढवण्यासाठी सर्वतोपरी युवकांची मोठी फळी उभी करण्यासाठी काम करणार**
>
> **रवींद्र गायखे पाटील**
> **नवनिर्वाचित जिल्हा उपाध्यक्ष**

# सामाजिक जाणीवेतून पंढरपूरात स्वच्छता अभियान

## आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ३७० सदस्यांचा सहभाग



**निघोज : प्रतिनिधी**

**आषाढी एकादशीनिमित्त दरवर्षी लाखो भाविक पंढरपूरमध्ये विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनाला येतात. आषाढीएकादशी झाल्यानंतर ११ वर्षापासुन आर्ट ऑफ लिव्हिंग सदस्य पंढरपूरमध्ये स्वच्छता अभियान राबवत असतात.या वर्षीही आर्ट आफ लिव्हिंगच्या ३७० सदस्यांनी पंढरपूर मध्ये स्वच्छता अभियान राबवत पांडुरंगाची अनोखी सेवा केली आहे.**

अहिल्यानगर जिल्हयाचे आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रमुख अमर कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा चेतना फाउंडेशनच्या सहकार्याने हे अभियान राबवण्यात आले.या अभियानामध्ये पुणे, नगर, निघोज, सोनई,बीड येथून भाविकही सहभागी झाले होते.या स्वयंसेवकांनी हे स्वच्छता अभियान राबवत सुमारे पाच ट्रक कचरा पंढरपुरातून जमा करून त्याची विल्हेवाट लावली.

सामाजिक भान ठेवत तसेच कुठल्याही प्रकारच्या वा कुणाच्या मदतीची अपेक्षा न ठेवता स्वयंसेवकांनी केलेल्या स्वच्छतेच्या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ही मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता केली यासाठी स्वयंसेवकांची वेगवेगळी पथके तयार करून जवळपास १२ ट्रक पेक्षा जास्त कचरा संकलित करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.यामध्ये पंढरपुरातील ६५ एकराचा वारी तळ, गोपाळपूर, वाळवंट परिसर, चंद्रभागा नदी परिसर, भक्ती मार्ग आदी भाग स्वच्छ करण्यात आला.यामध्ये प्लास्टिक पिशव्यांचा खच, द्रोण, ग्लास, केळीच्या साली, कुजलेले अन्न, तुटक्या चपला, पिशव्या, चंद्रभागेत भाविकांनी टाकलेले कपडे आदी भाग स्वच्छ करण्यात आले.या अभियानासाठी विशेष सहकार्य आमदार बबनराव पाचपुते, आमदार संग्राम जगताप आणि युवा नेते उदयन गडाख यांचे सहकार्य लाभले.

या मोहिमेत विलास हारदे, अड.सुनील गडाख,सहाय्यक पोलिस निरीक्षक अशोक निकम , ठकाराम गायखे, विष्णू लाळगे, संस्थेचे सचिव, योगेश काकडे, अनिकेत निंबाळकर, महेश अजबे, अर्जुन सोनवणे, सुभाष सुतार, सोमनाथ पाबळे, महेश लुंगसे, सुनीता घाडगे आदी उपस्थित होते.

> **पोलिस खात्यातून सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवाभाव करण्याचा निर्णय घेतला निघोज व परिसरातील सामाजिक संस्थांना सहकार्य करणे तसेच आर्ट ऑफ लिव्हिंग सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन सामाजिक उपक्रम करणे हीच खरी ईश्वर सेवा आहे.**
>
> **अशोकराव निकम.**
> **(सेवानिवृत्त फौजदार)**

> **निघोज येथे व्यवसाय व शेती करीत असताना आपण जे चार पैसे कमवतो त्यातील काही भाग सामाजिक कामासाठी खर्च करणे हा खरा समाजसेवेतील आनंद आहे. आर्ट ऑफ लिव्हिंग माध्यमातून पंढरपूर शहर स्वच्छ करणे आणी सेवाभाव करणे हा वारी केल्याचा खरा आनंद आहे.**
>
> **विष्णू लाळगे**
> **(प्रगतीशील शेतकरी व व्यापारी असोसिएशन पदाधिकारी)**

> **गेली अकारा वर्षांपासून आम्ही पंढरपूर येथे स्वच्छता करण्यासाठी जात असतो विठ्ठल जरी विटेवरी उभा असला तरी तो सगळ्या जगाचा पोशिंदा आहे मग पांडुरंगाची सेवा म्हणजे पंढरपूरची सेवा करण्यात आम्हाला धन्यता वाटत आहे.**
>
> **ठकाराम गायखे**
> **(मळगंगा देवीचे पुजारी)**

> **गेली अकारा वर्षांपासून आम्ही पंढरपूर येथे स्वच्छता करण्यासाठी जात असतो विठ्ठल जरी विटेवरी उभा असला तरी तो सगळ्या जगाचा पोशिंदा आहे मग पांडुरंगाची सेवा म्हणजे पंढरपूरची सेवा करण्यात आम्हाला धन्यता वाटत आहे.**
>
> **ठकाराम गायखे**
> **(मळगंगा देवीचे पुजारी)**

# फरार धोंड्या जाधवची कैफियत एसपींच्या दारी!

## जत्रा हॉटेल हल्ला प्रकरण । कारवाई होण्यासाठी भुकन बंधूंची खा.नीलेश लंके यांच्याकडे धाव

**निघोज : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके यांनी सोमवारी पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर सुरू केलेल्या उपोषणाला मोठा प्रतिसाद मिळाला असून पहिल्या दिवशी व दुसऱ्या दिवशी जिल्ह्यातील शेकडो लोकांनी पोलिस खात्याच्या विरोधात अनेक तक्रारी दाखल करीत खासदार लंके यांच्या उपोषणाला जोरदार पाठिंबा दिला आहे.**

पारनेर तालुक्यातील निघोज येथील जत्रा हॉटेलचे मालक गणेश भुकन व प्रविण भुकन या बंधूंनी खासदार लंके यांची उपोषणस्थळी भेट घेऊन जत्रा हॉटेलवर झालेल्या हल्ल्याची सविस्तर माहिती दिली यावेळी निघोजचे माजी सरपंच ठकाराम लंके,किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा शिवाजीराव लंके, माजी महापौर भगवान फुलसौंदर, कैलास गाडीलकर, उद्योजक संजय गारुडकर, अंबादास गारुडकर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सहसचिव विश्वास शेटे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदस्य भाऊसाहेब चौरे, लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानचे प्रवक्ते विकास शेटे आदी उपस्थित होते.

भुकन यांनी निवेदनात म्हटले आहे की अद्याप एकवीस दिवस होऊनही मुख्य सुत्रधार व सराईत गुन्हेगार धोंड्या जाधव व त्याचा साथीदार सोन्या उर्फ प्रथमेश सोनवणे हे दोघे फरार असून स्थानिक पोलीस पाठीशी घालीत असल्याने अद्याप बाहेर असून अद्यापही त्यांची दहशत निघोज व परिसरात सुरू असून या दोघा आरोपींना अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना भाग पाडावे अशी मागणी भुकन बंधू यांनी केली आहे. जत्रा हॉटेल हल्ला प्रकरणातील घटनेचा निषेध करण्यासाठी निघोज येथील व्यापारी व व्यावसायिक यांनी स्वयंस्फूर्तीने बंद ठेऊन गावकऱ्यांनी निषेध सभा घेतली त्यामध्ये मोक्का कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

ग्रामपंचायतने ग्रामसभेत या गुन्हेगारांना मोक्का कारवाई करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर केला. हा ठराव व गुन्हेगारांना कडक शिक्षा करण्याची मागणी असणारे निवेदन पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्याकडे आठ दिवसांपूर्वी शिष्टमंडळाने समक्ष दिले आहे. असे असूनही स्थानिक पोलीस मात्र गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे काम करीत असून दोन आरोपी अद्याप निघोज परिसरात फिरत आहेत. हा प्रकार निंदनीय आहे याचा अर्थ पोलीसांची कोनतीही भिती आरोपींना नाही याचाच अर्थ यामध्ये फार मोठा आर्थिक व्यवहार होत असून पोलिस राजरोस खंडणी बहादरांना पाठीशी घालण्याचे काम करीत असून यामध्ये गुन्हेगार जेवढे दोषी आहेत तेवढेच पोलिस दोषी असून याची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी भुकन बंधूंनी खासदार लंके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खासदार लंके यांनी यावेळी लगेच पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना भ्रमणध्वनीवर चर्चा करुन गुन्हेगारांना लवकरात लवकर अटक कशी होईल आणि याबाबत दोषी पोलीसांवर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा केला यावेळी त्यांनी लगेच पोलीस यंत्रणा सतर्क राहण्याची ग्वाही दिली.




**पारनेर तालुक्यातील निघोज येथील हॉटेल जत्रा हल्ला प्रकरणात दोषी आरोपींना मोक्का कारवाई करावी तसेच संबंधित पोलीसांना सुचना देण्याच्या मागणीसाठी जत्रा हॉटेलचे मालक गणेश भुकन, माजी सरपंच ठकाराम लंके यांनी खासदार नीलेश लंके यांची भेट घेऊन निवेदन दिले.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com